महाराष्ट्र शासन
वित्त विभाग
संचालनालय, लेखा व कोषागारे
कस्तुरी बिल्डींग,तळ मजला, ज.टाटा मार्ग
पेट्रोलियम हाऊसच्या समोर, चर्चगेट, मुंबई ४०० ०२०
दूरध्वनी क्र:- ०२२-२२८८०१०६/१०७/१०८ email id: aao.prashakosha-mh@gov.in

संदर्भ:

१. महाराष्ट्र शासन वित्त विभाग शासन निर्णय क्र.पीएवाय-१०८२/सीआर-११००(एक)/एसईआर-३, दि.०६.११.१९८४
२. महाराष्ट्र शासन वित्त विभाग शासन निर्णय, सामान्य प्रशासन विभाग क्र.एसआरव्ही-१०९५/प्र.क्र.१/९५/बारा, दि.०८.०६.१९९५.
३. महाराष्ट्र शासन वित्त विभाग शासन निर्णय, वित्त विभाग क्र.११०९/प्र.क्र.४४/सेवा-३, दि.०१.०४.२०१०.
४. महाराष्ट्र शासन वित्त विभाग शासन वित्त विभाग क्र.वेतन/११११ प्र.क्र.८/सेवा-३ , दि.०१.०७.२०११
५. महाराष्ट्र शासन वित्त विभाग शासन निर्णय क्र.आप्रयो/१०१५ प्र.क्र.१११/२०१५/सेवा-३ ,दि.२३.१२.२०१५
६. महाराष्ट्र शासन वित्त विभाग शासन परिपत्रक क्र. वेपूर-२०१९/प्र.क्र.८/सेवा-९, दि.२०.०२.२०१९
७. महाराष्ट्र शासन वित्त विभाग शासन निर्णय क्र.वेतन १११९/प्र.क्र.३/२०१९/सेवा.३, दि.०२.०३.२०१९
८. महाराष्ट्र शासन वित्त विभाग शासन निर्णय क्र.वेतन१११९/प्र.क्र.३/२०१९/सेवा.३, दि.०७.१०.२०२२

क्र.संलेको/प्रशा कोषा/कार्या.३/आप्रयो लाभ /763 दिनांक : 05 JUL 2024

//आदेश//

**विषय :- राज्य शासकीय अधिकारी/कर्मचारी यांना सातव्या वेतन आयोगानुसार सुधारीत सेवांतर्गत आश्वासित प्रगती योजने अंतर्गत लघुलेखक (उच्चश्रेणी) या पदाचा लाभ अनुज्ञेय करणेबाबत**

उपरोक्त संदर्भ क्र.७ वरील शासन निर्णयान्वये सातव्या वेतन आयोगानुसार शासकीय अधिकारी/कर्मचारी यांना १०, २० व ३० वर्षाच्या नियमित सेवेनंतरची तीन लाभांची सुधारीत सेवांतर्गत आश्वासित प्रगती योजना दि.०१.०१.२०१६ पासून लागू करण्यात आली आहे.

त्यानुसार संचालनालयाच्या अधिनस्त लघुलेखक ( निम्नश्रेणी ) संवर्गातील वेतनश्रेणी एस-१५ (वेतन संरचना ४१८००-१३२३००) या वेतन संरचनेत वेतन घेणाऱ्या कर्मचाऱ्यांना सुधारीत सेवांतर्गत आश्वासित प्रगती योजनेअंतर्गत "लघुलेखक ( उच्चश्रेणी )" या संवर्गातील पदाची वेतनश्रेणी एस-१६ (वेतन संरचना रु.४४९००-१४२४००) त्यांचे नावांसमोर दर्शविलेल्या दिनांकापासून खालील अटी व शर्तींच्या अधीन राहून मंजूर करण्यात येत आहे.

**संचालनालयाच्या अधिनस्त कार्यालयातील अधिकारी/कर्मचाऱ्यांना १० वर्षाच्या नियमित सेवेनंतर सुधारीत सेवांतर्गत आश्वासित प्रगती योजनेअंतर्गत वरिष्ठ पदाच्या वेतनश्रेणीचा लाभ :**

| अ.क्र. | कर्मचाऱ्याचे नाव सध्याचे पदनाम, विभाग | शासन सेवेतील नियुक्तीचा दिनांक व पद | नियुक्ती नंतर मिळालेल्या पदोन्नतीचा दिनांक व पदनाम | तीन लाभांच्या सुधारीत सेवांतर्गत आश्वासित प्रगती योजनेअंतर्गत पहिला लाभ अनुज्ञेय होण्याचा दिनांक व पदनाम |
|---|---|---|---|---|
| १ | २ | ३ | ४ | ५ |
| १ | श्रीम.मानसी अविनाश सुर्वे, लघुलेखक ( निम्नश्रेणी ), कोकण विभाग | ०७.०६.२००८ लिपिक टंकलेखक<br>०१.०२.२०१३ लघुलेखक (निम्नश्रेणी) (नामनिर्देशनाने नियुक्ती) | निरंक | ०१.०२.२०२३ लघुलेखक ( उच्चश्रेणी ) |

**अटी व शर्ती:-**

१ संबंधित कार्यालय प्रमुखांद्वारे सदर कर्मचाऱ्यांना या योजनेचा लाभ त्यांच्या नावासमोर दर्शविलेल्या दिनांकापासून देण्यात यावा.

२. संदर्भांकीत १ वरील शासन निर्णयान्वये व संदर्भांकीत ६ वरील शासन परिपत्रकान्वये संबंधित कर्मचाऱ्याचा वरिष्ठ वेतनश्रेणीतील वेतन निश्चितीकरिता विकल्प घेण्यात यावा व त्यानुसार वेतननिश्चिती करण्यात यावी.

३. सुधारीत सेवांतर्गत आश्वासित प्रगती योजनेच्या लाभामुळे संबंधित अधिकारी/कर्मचारी वर्गाच्या जबाबदारी आणि कर्तव्यामध्ये वाढ होत नसली तरी त्यांना संदर्भाधीन शासन निर्णयातील तरतूदीच्या अधीन राहून नियमित पदोन्नतीप्रमाणे पदोन्नतीच्या पदाच्या वेतन संरचनेत वेतननिश्चितीचा लाभ मिळेल. या योजनेअंतर्गत वरिष्ठ वेतन संरचना दिल्यानंतर वेतननिश्चिती नियमित पदोन्नती प्रमाणेच करण्यात येईल. मात्र त्याच वेतनश्रेणीत नियमित / कार्यात्मक पदोन्नती मिळाल्यावर पुन्हा वेतन निश्चितीचा लाभ देय होणार नाही.

४ संदर्भ क्र.४ वरील शासन निर्णयात नमूद केल्याप्रमाणे, प्रत्यक्ष पदोन्नती नाकारलेल्या अथवा नियमित

पदोन्नतीस अपात्र ठरलेल्या कर्मचाऱ्यांना या योजनेचा लाभ देय होणार नाही. या योजनेअंतर्गत वरिष्ठ वेतनश्रेणी दिल्यानंतर प्रत्यक्ष पदोन्नती नाकारलेल्या अथवा पदोन्नतीस अपात्र ठरलेल्या कर्मचाऱ्यांना यापूर्वी देण्यात आलेले लाभ काढून घेण्यात यावेत, मात्र दिलेल्या लाभांची वसूली करण्यात येऊ नये. तसेच असे लाभ काढून घेतल्यानंतर संबंधितांची वेतननिश्चिती ही त्यांना जणू काही या योजनेचे लाभ देण्यात आले नव्हते असे समजून, महाराष्ट्र नागरी सेवा (वेतन) नियम १९८१ मधील नियम १२ च्या तरतूदीनुसार करण्यात यावी.

सदरचे आदेश www.mahakosh.maharashtra.gov.in या संचालनालयाच्या संकेतस्थळावर प्रसिध्द करण्यात येत आहेत. सदर संकेतस्थळावरील प्रत ग्राहय धरण्यात यावी.

(दीपा देशपांडे)
संचालक,
संचालनालय, लेखा व कोषागारे, मुंबई
महाराष्ट्र राज्य, मुंबई.

प्रत -

१. उपसंचालक, राज्य अभिलेख देखभाल अभिकरण, मुंबई
२. संबंधित कर्मचारी ( कार्यालयामार्फत).
३. निवड नस्ती (प्रशा कोषा)